# प्रकरण तिसरे

.....................................................................

# इचलकरंजी नगरपरिषदेची निवडणूक व महिलांचा राजकीय सहभाग (२००१ ते २०१०)

# प्रकरण — तिसरे

# इचलकरंजी नगरपरिषदेची निवडणूक व महिलांचा राजकीय सहभाग

# (२००१ ते २०१०)

---

३.१ प्रस्तावना

३.२ महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक व महिलांचा राजकीय सहभाग

३.३ स्थानिक स्वराज्य संस्था व महिला राजकीय सहभाग

३.४ इचलकरंजी नगरपरिषदेची निवडणूका व महिलांचा सहभाग

३.५ २००१ ते २०१० पर्यंत झालेल्या इचलकरंजी नगरपरिषदेच्या निवडणूकीमधील महिला सहभागाचे विश्लेषण

३.५.१ २००१ मधील इचलकरंजी नगरपरिषदेची निवडणूक

३.५.२ २००६ मधील इचलकरंजी नगरपरिषदेची निवडणूक

३.६ सारांश

## प्रकरण — तिसरे

## इचलकरंजी नगरपरिषदेची निवडणूक व महिलांचा राजकीय सहभाग

## (२००१ ते २०१०)

### ३.१ प्रस्तावना:—

महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्थेतील निवडणूकांमध्ये महिलांचा राजकीय सहभागात वाढ होत आहे. महिला या राजकीय सहभागाच्या माध्यमातून प्रशासनाच्या कामकाजात दिसत आहेत. शहरी स्वराज्य संस्थेतील महानगरपालिका, नगरपालिका या संस्थामध्ये महिला निवडणूकीच्या माध्यमातून आपला सहभाग नोंदवितात. हा महिलांचा राजकीय सहभाग २००१ नंतर वाढलेला आहे का? तो पाहण्याच्या दृष्टिकोनातून इचलकरंजी हे नगरपरिषद क्षेत्र निवडलेले असून इचलकरंजी नगरपरिषदेतील २००१ ते २०१० मध्ये झालेल्या दोन पंचवार्षिक निवडणूकीचे विश्लेषण करून महिलांचा राजकीय सहभाग किती आहे? याचा आढावा प्रस्तूत प्रकरणामध्ये घेण्यात आला आहे.

### ३.२ महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक व महिलांचा राजकीय सहभाग

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रक्रियेला सुरूवात झाली. वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीने स्थानिक स्तरावर जिल्हा परिषद पंचायत समिती व ग्रामपंचायत ही त्रिस्तरिय रचना स्विकारली तसेच नागरी स्वराज्य संस्थेमध्ये १९६२ साली कायदा करून नगरपालिका, महानगरपालिका यांची तरतूद केली. या संस्थांच्या स्थापनेबरोबरच महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा, शिक्षण संस्थाच्या विकासाला गती प्राप्त झाली. या संस्थाच्या माध्यमातून महाराष्ट्रात राजकारणाची बिजे रोवली गेली. महाराष्ट्रात या दशकात महिलांचा सहभाग राजकीय परिघावर होता. महिलांचा फक्त नाममात्र सहभाग राजकारणात दिसून येत होता. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर १९६२ साली विधानसभेची पहिली निवडणूक झाली. या निवडणूकी महिलांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत नगण्यच होते. पुढे १९७०—८० च्या दशकांमध्ये महिला विविध आंदोलनाच्या माध्यमातून राजकरणाशी जोडल्या जावू लागल्या त्यामध्ये प्रामुख्याने महागाई विरूध्द आंदोलनांचा उल्लेख करावा लागेल. प्रभा

राव, प्रतिभा पाटील, जयंतीबाई मेहता या महिलांच्याकडे महिला राजकारणातील सहभाग म्हणून प्राथमिक स्वरूपात पाहता येईल. १९८० च्या विधानसभा निवडणूकीत १९ महिला निवडून आल्या. हे प्रमाण पुरूष सदस्यांपेक्षा कमी असले तरी महाराष्ट्रातील वेगवेगळया प्रादेशिक विभागातून या महिला निवडून आल्या होत्या यामुळे त्यांच्या निवडीला वेगळे महत्व होते. यातुन महिलांचा राजकारणातील सहभागाची संपूर्ण महाराष्ट्रात सुरू झालेली दिसून येते. महिलांच्या राजकीय संघटनाला १९९० च्या दशकामध्ये तीव्र गतीने चालना मिळाली. त्याचे कारण म्हणजे महाराष्ट्र शासनाने १९९३ साली राज्य महिला आयोगाची स्थापना केली व महिला सबलीकरणाचे धोरण जाहिर केले. यातुनच पुढे १९८४ मध्ये महाराष्ट्र शासनाने महिला धोरण जाहिर केले. या धोरणानूसार स्थानिक स्वराज्य संस्था नागरी स्वराज्य संस्था सरकारी नोक—यामध्ये ३० टक्के आरक्षणाची तरतूद केली. या आरक्षणाची मर्यादा पुढे ३३ टक्के केलेली दिसून येते व आज हे आरक्षण ५० टक्के लागू केले आहे.

१९९० च्या दशकात स्विकारलेले महिला धोरण आरक्षणाची तरतूद यामुळे विविध राजकीय पक्षानी महिला आघाडया स्थापन केल्या त्यामध्ये प्रामुख्याने कॉंग्रेस महिला आघाडी, शिवसेना भाजप या पक्षाची आघाडी होय. शिवसेना पक्षाची महिला आघाडीचे प्रतिक दुर्गा व शक्ती होते. शिवसेनाच्या महिला आघाडया फारच सक्रिय अशा होत्या. वेगवेगळया महिलांनी विविध विषयावर आंदोलने छेडलेली दिसून येतात. भाजप पक्षांनेही महिलांचा सहभाग वाढवला. एक प्रकारे महिलांच्या सहभागातून राजकीय संघटन मोठया प्रमाणात केले गेले. महिलांचा पक्षीय कामकाजामध्ये तसेच विविध पक्षांच्या पदामध्ये सहभाग वाढवला.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून ते २००९ च्या निवडणूकीपर्यंत महाराष्ट्र विधानसभेच्या ११ निवडणूका झाल्या. या कालावधीत महाराष्ट्रामध्ये वेगवेगळया दशकात महिलांचा राजकीय सहभाग क्रमाक्रमाने वाढलेला दिसतो. यातच महाराष्ट्र शासनाने स्विकारलेले महिला धोरण त्यातुन महिलांना मिळालेले आरक्षण राजकीय पक्षांनी आपल्या संघटनेमध्ये महिलांचा करून घेतलेला सहभाग, शिक्षणामुळे महिलांमध्ये आलेली जागृती यासर्वांचा परिपक्वता म्हणजे महाराष्ट्रामध्ये काही प्रमाणात

महिलांना राजकीय सहभागाचा चंचूप्रदेश मिळालेला दिसून येतो. खालील तक्त्यामध्ये आपण आतापर्यंत झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये महिलांचा सहभाग पाहूया.

**तक्ता ३.१**

**विधानसभा निवडणूकीतील महिलांचा सहभाग**

| अ. नं. | वर्ष | महिला सदस्य | पंचवार्षिक टक्केवारी | पुरूष सदस्य | टक्केवारी | एकुण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९६२ | १३ | ११.११ | २५१ | ८.३९ | २६४ | ४.९२ |
| २ | १९६७ | ०९ | ७.६९ | २६१ | ८.७३ | २७० | ३.३३ |
| ३ | १९७२ | ०० | — | २७० | ९.०३ | २७० | — |
| ४ | १९७८ | ०८ | ६.८४ | २८० | ९.३६ | २८८ | २.७८ |
| ५ | १९८० | १९ | १६.२४ | २६९ | ८.९९ | २८८ | ६.६० |
| ६ | १९८५ | १६ | १३.६८ | २७२ | ९.०९ | २८८ | ५.५६ |
| ७ | १९९० | ०६ | ५.१३ | २८२ | ९.४३ | २८८ | २.०८ |
| ८ | १९९५ | ११ | ९.४० | २७७ | ९.२६ | २८८ | ३.८२ |
| ९ | १९९९ | १२ | १०.२६ | २७६ | ९.२३ | २८८ | ४.१७ |
| १० | २००४ | १२ | १०.२६ | २७६ | ९.२३ | २८८ | ४.१७ |
| ११ | २००९ | ११ | ९.४० | २७७ | ९.२६ | २८८ | ३.८२ |
| | एकूण: | ११७ | | २९९१ | | ३१०८ | ३.७६ |

स्त्रोत:निवडणूक आयोग अहवाल,२००९

तक्ता ३.१ नूसार १९६२ ते २००९ पर्यंतच्या महाराष्ट्राच्या विधानसभेत महिलांचा राजकीय सहभाग आकडेवारीच्या स्वरूपात दर्शविलेला आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेत १९६२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये १३ महिला निवडून आल्या असून या महिलांची एकूण विधानसभेतील संख्येच्या एकूण टक्केवारीपैकी ४.९२ टक्के प्रमाण असल्याचे दिसते. हे प्रमाण १९७२ च्या निवडणूकीमध्ये पूर्णपणे घटलेले असून या निवडणूकीमध्ये एकही महिला उमेदवार निवडून आल्याचे दिसत नाही. १९७८ नंतर महाराष्ट्राच्या विधानसभेची एकूण सदस्य संख्या २८८ झाली. ही सदस्य संख्या



BARR. BALASAHEB KHARDEKAR

२००९ पर्यंत एकसारखी राहिल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणूकीमध्ये १९६२ ते २००९ दरम्यान झालेल्या विधानसभेच्या ११ निवडणूकीमध्ये १९८० साली झालेल्या ५ व्या महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणूकीमध्ये सर्वात जास्त म्हणजे १९ महिला सदस्य निवडून आलेल्या दिसतात. वरील तक्त्यानूसार महिलांचा राजकीय सहभाग १९६२ ते १९७८ च्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणूकीमध्ये पुरूषांच्या तुलनेने काही प्रमाणात धिम्यागतीने दिसतो. १९८० व १९८५ मध्ये महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणूकीमध्ये महिलांच्या राजकीय सहभागामध्ये एकूण ११ निवडणूकीतील विश्लेषण केल्यास असे दिसते की, हा सहभाग वाढलेला दिसतो. आतापर्यंत ज्या ११ महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणूका झाल्या त्यामध्ये एकूण ११७ महिला सदस्या निवडून आल्या. या ११ निवडणूकीपैकी १९८० व ८५ च्या निवडणूकीमध्ये महिला सदस्यांची टक्केवारी अनुक्रमे १६.२४ व १३.६८ टक्के असल्याचे दिसते. महिला सदस्यांची विधानसभेच्या निवडणूकीमध्ये सहभागाची नोंद घेतली असला असे दिसते की, त्यांची टक्केवारी बदलत असल्याचे दिसते. त्यामध्ये १९७२, १९७८ व १९९० मध्ये विधानसभेत अनुक्रमे ०,६.८४ व ५.१३ टक्के ही अतिशय कमी सहभागाची नोंद दिसून येते. या निवडणूकीमध्ये स्त्रियांच्या तुलनेने पुरूष सदस्य संख्यांचे विश्लेषण केले असता असे दिसते की, पुरूषांची संख्या सातत्याने तीच असल्याचे दिसते.

विधानसभेच्या ११ निवडणूकीमध्ये महिलांचा राजकीय सहभागाची पुरूषांची तुलना केली असता आपणास दिसून येते की, महिलांचा राजकीय सहभाग हा महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणूकीमध्ये सरासरी ३.७६ टक्के असल्याचे दिसते. यावरून महिलांचा राजकीय सहभाग निवडणूकीमध्ये अल्प असल्याचा दिसून येतो. हा सहभाग वाढविणे गरजेचे असल्याचे दिसते.

### ३.३ स्थानिक स्वराज्य संस्था व महिला राजकीय सहभागः—

महिलांचा राजकीय सहभागात विधानसभेची पार्श्वभूमी पाहिली असता हा सहभाग काही प्रमाणात कमी असलेला दिसतो. परंतू महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपालिका,

महानगरपालिका, नगरपरिषदा यासंस्थांमध्ये सहभाग हा लक्षणीय असलेला दिसून येतो. महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थामधील सहभाग हा १९९० नंतर वाढलेला दिसतो. १९९० पूर्वी महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडणूकीमध्ये काही प्रमाणात असमानता दिसून येते. निवडणूका या वेळेवर होत नव्हत्या. परंतू त्यामुळे महिलांच्या सहभागाची शक्यता धुसळ होती. पण १९९३—९४ साली स्थानिक स्वराज्य संस्थेसंबधी ७३ वी ७४ वी घटना दुरूस्ती झाली. यातील ७३ वी घटना दुरूस्ती ही ग्रामीण स्वराज्य संस्थेकरिता होती. तर ७४ वी घटना दुरूस्ती ही शहरी स्वराज्य संस्थेकरिता होती. या घटनादुरूस्तीमुळे दर पाच वर्षांनी या संस्थांना निवडणूक घेणे बंधनकारक होते. तसेच महिलांना महाराष्ट्र शासनाने १९९४ साली ३० टक्के आरक्षण जाहिर केले. पुढे या आरक्षणाची व्याप्ती वाढली व पंचायत समिती आणि नगरपालिकेमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षणाची तरतूद केली गेली. यामुळे महिलांचा राजकीय सहभाग निवडणूकीमध्ये मोठया प्रमाणात वाढला. खालील तक्त्यामध्ये महिलांचा पंचायत समिती, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिकामधील राजकीय सहभाग नोंदविलेला आहे

**तक्ता ३.२**
**२००४ ते २००९ मधील निवडणूकीमधील महिलांचा सहभाग**

| अ. नं. | संस्था | एकूण जागेची संख्या | महिला संख्या | महिला सहभाग टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | पंचायत समिती | ३९२२ | १४२१ | ३६.२३ |
| २ | जिल्हा परिषद | १९६१ | ६६२ | ३३.७६ |
| ३ | महानगरपालिका | १२३० | ४२७ | ३४.७२ |
| ४ | नगरपालिका | ५०९२ | १७५९ | ३४.५४ |

स्त्रोतः— राज्य निवडणूक अहवाल, २००९

तक्ता ३.२ आपणास पंचायत समिती व नागरी स्वराज्य संस्थेतील २००४ ते २००९ मधील नगरपालिका महानगरपालिका जिल्हा परिषद, पंचायत समिती या नागरी व ग्रामीण स्वराज्य संस्थेमध्ये ज्या निवडणूका झाल्या त्या निवडणूकीमध्ये वरील तक्त्यानूसार महिलांचा राजकीय सहभाग नगरपालिकेच्या निवडणूकीमध्ये इतर स्वराज्य

संस्थेपेक्षा जास्त दिसून येतो. पुरूषांच्या मानाने महिलांची टक्केवारी सरासरी ३४.७२ टक्के दिसून येते. ही पुरूषांच्या एकूण टक्केवारीच्या एकतृतीएंश असलेली दिसून येते. महिलांचा राजकारणातील सहभागाचा पल्ला अजूनही खूप लांब असल्याचे या निवडणूकीतील आकडेवारीच्या विश्लेषणावरून आपल्याला दिसते. या महिलांचा राजकीय सहभाग हा ५० टक्के असणे आवश्यक आहे. परंतू तो ५० टक्केपेक्षा कमी असलेला दिसतो. त्यामुळे महिलांच्या राजकीय सहभागाची गरज निर्माण करणे व त्यांना राजकीय निवडणूकीमध्ये संधी देणे गरजेचे आहे.

**३.४ इचलकरंजी नगरपरिषद निवडणूका व महिलांचा सहभागः—**

१९ व्या शतकाच्या मध्यापासून महाराष्ट्रातील अनेक नगरांमध्ये नगरपालिकांनी महत्वाची कामगिरी केली आहे. लोकशाही आणि राज्यकारभाराचे प्राथमिक धडे प्रथम ग्रामपंचायती वा नगरपालिकेव्दारे प्राप्त होत असतात. बाबासाहेबांनी नगरपालिकेचे महत्व ओळखल्याने राज्यकारभार हाती घेतल्यानंतर लागलीच दुस—या वर्षी म्हणजे १ नोव्हेंबर १८९३ रोजी नगरपालिकेची स्थापना केली. या नगरपालिकेची रचना आणि कामकाज पध्दती कोल्हापूरच्या १८८८ च्या कायद्याप्रमाणे केली. ज्यावेळी नगरपालिकेची स्थापना केली तेंव्हा नगराची लोकसंख्या ९१०७ इतकी होती. तसेच नगरपालिका सदस्यांची संख्या १३ इतकी होती. सुरूवातीला नगरपालिकेचा कार्याध्यक्ष व अध्यक्ष लोकप्रतिनिधीव्दारे निवडला जात नसे तर सरकारमार्फत नेमला जाई.

सुरूवातीस नगरपालिकेचे कार्यालय नरसोबाच्या मंदिरात होते. परंतू ते ठिकाण अपूरे पडू लागल्याने सन १९११ मध्ये पालिकेसाठी नवीन इमारत बांधली. बाबासाहेबांनी यासाठी आर्थिक मदत केली. पुढील काळात ही वास्तु अपूरी पडू लागली म्हणून परत १९२६—२७ मध्ये दुसरे कार्यालय बांधण्यात आले यासाठी १२,००० इतका खर्च आला होता.[१]

इचलकरंजी नगरपालिकेचा कारभार प्रथमपासून योग्य रितीने चालत असे. याचे महत्वाचे कारण म्हणजे बाबासाहेबांचे नगरपालिकेच्या कामकाजावर सतत असलेले लक्ष होय. त्यामुळे दरवर्षी नगरपालिकेचे उत्पन्नात वाढ होत गेली. १९०४ ते १९२७ च्या काळात बाहेरून येणा—या कामगारांची संख्या वाढल्याने इचलकरंजी नगरपालिकेचे उत्पन्न वाढत गेले. त्या काळात बाबासाहेबांनी शहरात येणा—या मालावर कोणत्याही

प्रकारची जकात आकारली जावू नये असे धोरण स्विकारले होते. याचा परिणाम नगरपालिकेच्या उत्पन्नावर जरी होत असला तरी व्यापारवृध्दीसाठी त्याची बरीच मदत झाली.[२]

सन १९२७ मध्ये नगरपालिकेस टाउन म्युनिसिपलचा दर्जा प्राप्त झाला आणि त्याचबरोबर ही संस्था बहुतांशी लोकनियुक्त प्रतिनिधींची करण्यात आली. सरकार नियुक्त सदस्यांचे यानंतरच्या काळात महत्व संपुष्टात आले. यावेळी सभासदांची संख्या १८ इतकी होती. त्यामध्ये ९ सदस्य लोकांनी निवडले होती आणि तीन सदस्य बिनसरकारी निवडलेले होते. ६ सदस्य हे सरकारी होते. नगरपालिकेच्या अध्यक्षांची निवड मात्र लोकनियुक्त मतदारांतूनच होत असे.

१९३० साली ही संख्या लोकल सेल्फ गव्हर्न्मेंट इन्स्टिटयुट, मुंबई या संस्थेची सभासद झाली. बाबासाहेबांच्या कारकिर्दीच्या पन्नासाव्या वर्षी म्हणजे १९४२ मध्ये येथील नगरपालिकेस कोल्हापूर नगरपालिकेचा दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे सरकार नियुक्त सभासदांची संख्या परत कमी होवून लोकप्रतिनिधींचा सहभाग अधिक वाढला.

सन १९४५ नंतर लोकनियुक्त सदस्यांकडून नगरपालिकेच्या कामाचा विस्तार होत गेला. पुढे १९४७ मध्ये लोकनियुक्त सदस्यांची संख्या १३ वरून २० पर्यंत वाढली. यामध्ये महिला, मागासवर्गीय व मुस्लिम वर्गासाठी काही जागा राखीव ठेवण्यात आल्या.

इचलकरंजी नगरपालिकेची स्थापना झाली त्यावेळी पालिकेची प्रशासन यंत्रणा ही लोकनियुक्त नव्हती, तर ती यंत्रणा सरकारकडून निवडली जात असे. सरकारकडून लोकप्रतिनिधींची निवड केली जात असे. नगरपालिका अध्यक्ष म्हणुन सरकारी अधिका—याची नेमणुक सरकारच करीत असे. हे सरकारी अधिकारी कर्मचा—यांना सूचना देत असत व त्याची अमंलबजावणी पालिका कर्मचारी करीत.

१९७४ साली नगराध्यक्ष म्हणुन पंडित कुलकर्णी यांची निवड प्रत्यक्ष नागरीकडून झाली. त्यांच्या बाजूला नगरसेवक तर इतर सदस्य हे कॉंग्रेसचे होते. १९८०—८२ दरम्यान नगरपालिकेत प्रशासकीय राजवट होती. अंतर्गत अशांतता व कोणात्यही पक्षाचे स्पष्ट वर्चस्व नसल्याने प्रशासकीय राजवट निर्माण झाली. १९८४—८५ मध्ये कॉ. मलाबादे हे नगराध्याक्ष पदावर कार्यरत होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक

महत्वाची कार्ये केलेली दिसून येतात. त्यात महत्वाचे म्हणजे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवला.

इचलकरंजी नगरपालिकेचे १९८५ नंतर राजकारणाचे स्वरूप पालटले. १९८५ पूर्वी कॉंग्रेस विरोधी नागरिक आघाडी अशी सत्ता स्पर्धा होती. शिवाय बराच काळ प्रशासकीय राजवट होती. पण १९८५ नंतर भाजप, कम्युनिस्ट, जनता दल, अपक्ष वगैरे पक्षातून उमेदवार निवडून येवू लागले. १९९१ च्या पालिका निवडणूकीत कॉंग्रेसचे ४३ मार्क्सवादी कम्युनिस्ट व अपक्ष असे २० नगरसेवक निवडून आले. श्री. अशोक आरगे यांची नगराध्यक्ष पदी निवड झाली. साधारणपणे तीन साडे तीन हजार मतदानांसाठी एक याप्रमाणे ७५ वॉर्ड निर्माण केले होते. या २३ वॉर्ड स्त्रियांसाठी राखीव होते. यामध्ये कॉंग्रेसकडून स्त्रिया निवडून आल्या. सन १९९६ च्या नगरपालिका निवडणूकीत नागरिकाकडून निवडून आलेले ७५ व ७ स्विकृत असे एकुण ८२ सदस्य निवडून आले होते. १९९६ च्या निवडणूकीमध्ये अवाडे गटाचा पराभव होवून शहर आघाडीला सत्ता प्राप्त झाली व हिंदूराव शेळके नगरअध्यक्ष म्हणून निवडून आले.

**३.५ २००१ ते २०१० पर्यंत झालेल्या इचलकरंजी नगरपरिषदेच्या निवडणूकीमधील महिला सहभागाचे विश्लेषण:—** २००१ ते २०१० दरम्यान इचलकरंजी नगरपरिषदेच्या दोन पंचवार्षिक निवडणूका झाल्या महिलांना ५० टक्के आरक्षणाची अंमलबजावणी ग्रामीण व शहरी स्वराज्य संस्थेमध्ये लागू झाल्यानंतर महिलांचा सहभाग या संस्थामध्ये वाढू लागला. त्या अनुषंघाने इचलकरंजी नगरपरिषदेमध्येही याचे प्रतिबिंब दिसू लागले.

### ३.५.१ २००१ मधील इचलकरंजी नगरपरिषदेची निवडणूक


२००१ मध्ये इचलकरंजी नगरपरिषदेची निवडणूक झाली. या निवडणूकीमध्ये १९ वार्डमध्ये नगरपालिका क्षेत्र विभागलेले होते. या प्रत्येक वार्डमधून ४ किंवा ३ सदस्य निवडून येण्याची तरतूद होती. या निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या महिला व पुरूष सदस्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे

तक्ता ३.३

**इचलकरंजी नगरपरिषदेतील महिला पुरूष नगरसेवकांचे वर्गीकरण (२००१)**

| अ. न. | प्रकार | संख्या | टक्के |
|---|---|---|---|
| १ | महिला | २२ | ३८.५९ |
| २ | पुरूष | ३५ | ६१.४१ |
| | एकूण | ५७ | १०० |

स्त्रोत:— इचलकरंजी नगरपरिषदेच्या निवडणूकीचा निकाल




इचलकरंजी नगरपरिषदेची २००१ च्या निवडणूकीमध्ये १९ वार्डमधून ५७ सदस्य निवडून आले. या ५७ सदस्यांपैकी महिला सदस्यांची संख्या २२ इतकू आहे. ही सदस्य संख्या एकूण सभागृहातील एकूण टक्केवारीच्या ३८.५९ टक्के असल्याचे दिसते. महिलांची संख्या येथे ५० टक्के गेलेली दिसून येत नाही.

तक्ता ३.४

**इचलकरंजी नगरपरिषदेच्या महिला नगरसेवकांचे प्रभागनिहाय वर्गीकरण (२००१)**

| अ.नं | प्रभाग क्रमांक | पुरूष नगरसेवकांची संख्या | महिला नगरसेवकांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | १ | — | ४ |
| २ | २ | ३ | — |
| ३ | ३ | १ | २ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | ४ | ३ | — |
| ५ | ५ | १ | २ |
| ६ | ६ | २ | १ |
| ७ | ७ | २ | १ |
| ८ | ८ | १ | २ |
| ९ | ९ | ३ | — |
| १० | १० | ३ | — |
| ११ | ११ | २ | १ |
| १२ | १२ | १ | २ |
| १३ | १३ | २ | १ |
| १४ | १४ | १ | २ |
| १५ | १५ | १ | २ |
| १६ | १६ | ३ | १ |
| १७ | १७ | २ | १ |
| १८ | १८ | २ | — |
| १९ | १९ | २ | — |
| | एकूण:— | ३५ | २२ |

स्त्रोत:— इचलकरंजी नगरपरिषदेचा निवडणूक निकाल २००१

वरील तक्त्यावरून असे दिसते की, इचलकरंजी नगरपरिषदेच्या २००१ च्या निवडणूकीचे महिला सदस्यांचे प्रभागनिहाय विश्लेषण केलेले आहे. प्रभाग क्रमांक २, ४, ९, १०, १८, आणि १९ प्रभागामध्ये एकही महिला सदस्य निवडून आलेली दिसत नाही. हे प्रभाग सर्वसाधारण गटातले असून येथे महिला आरक्षण नाही. हे आरक्षण नाही म्हणून तेथे महिला निवडून आलेल्या दिसत नाहीत. याउलट प्रभाग क्रमांक १ हा पूर्ण महिला आरक्षणाचा प्रभाग असून येथे चारही महिला निवडून आलेल्या दिसतात व प्रभाग क्रमांक ३, ५, ७, ११, १२, १५ या प्रभागांमध्ये महिला आरक्षण आहे व या प्रभागातून १—२ महिला निवडून आल्याचे दिसतात. वरील तक्त्यावरून असे दिसते


की, महिला आरक्षण असणा—या प्रभागातून महिला निवडून येत असताना दिसतात. परंतू ज्या प्रभागामध्ये महिला आरक्षण नाही. तेथे निवडून येत नसताना दिसतात. यावरून आरक्षणाची तरतूद महिलांच्या राजकीय सहभागाला कारणीभूत ठरल्याचे दिसते. जर हे आरक्षण नसते तर, महिला सदस्यांचे निवडून येण्याचे प्रमाण नगण्य असते.

**तक्ता ३.५**

**इचलकरंजी नगरपरिषदेतील महिला नगरसेवकांचे पक्षनिहाय वर्गीकरण (२००१)**

| अ.नं. | पक्ष | महिला नगरसेकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ११ | ४९ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, | ७ | ३२ |
| ३ | भाजप | १ | ५ |
| ४ | शिवसेना | ३ | १४ |
| ५ | अपक्ष | — | — |

स्त्रोतः— इचलकरंजी नगरपरिषदेचा निवडणूक निकाल २००१



इचलकरंजी नगरपरिषदेच्या २००१ च्या निवडणूकीमध्ये ज्या राजकीय पक्षानीं सहभाग घेतला त्यामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भाजप हे राष्ट्रीय स्तरांवरील पक्ष असून शिवसेना हा राज्यस्तरावरील पक्ष आहे. या पक्षातील महिला सदस्य निवडून येण्याचे प्रमाण राष्ट्रीय काँग्रेस पक्षामध्ये जास्त आहे. भाजप या पक्षाने महिला सदस्य निवडून येण्याचे प्रमाण फक्त ५ टक्के असून हे प्रमाण इतर पक्षांच्या महिला सदस्यांचे प्रमाण खूपच कमी असल्याचे दिसते. या निवडणूकीमध्ये राष्ट्रीय काँग्रेस पक्ष हा महिला राजकीय सहभागात इतर पक्षांपेक्षा यशस्वी झालेला दिसतो.

**तक्ता ३.६**

**इचलकरंजी नगरपरिषदेतील महिला नगरसेवकांचे जातीनिहाय वर्गीकरण(२००१)**

| अ.नु | महिला नगरसेवक | जात |
|---|---|---|
| १ | सौ.आवाडे किशोरी प्रकाश | जैन |
| २ | सौ.पोवार शंकुतला आवा | मराठा |
| ३ | सौ.दुडंगे जेवरबानू मैनोद्दीन | मुस्लीम |
| ४ | सौ.विभूते प्रतिभा उत्तम | मराठा |
| ५ | सौ.पाटील राजेश्वरी मारूती | मराठा |
| ६ | श्रीमती. उदगावे भारती गजानन | मराठा |
| ७ | सौ.जाधव सुजाता सुधाकर | मराठा |
| ८ | सौ.कलावंत मुमताज शहिदराव | मुस्लीम |
| ९ | सौ.मुजावर शहनाज पापालल | मुस्लीम |
| १0 | सौ.लवटे बेबीताई अग्नु | धनगर |
| ११ | सौ.सपाटे लक्ष्मी पांडुरंग | देवांग कोष्टी |
| १२ | सौ.गौड उमा महादेव | मराठा |
| १३ | सौ.देसाई कुदां शशीकांत | मराठा |
| १४ | सौ.जगताप गिता शिवाजी | महार |

| | | |
|---|---|---|
| १५ | सौ. माळी साधना सुहास | लिंगायत माळी |
| १६ | सौ. स्वामी अलका अशोक | लिंगायत |
| १७ | श्रीमती माच्छरे नुतन विष्णू | कारवान |
| १८ | सौ. वडवे मंगल बाबुराव | देवांग कोष्टी |
| १९ | श्रीमती . कांबळे अनुसया सुगंध | महार |
| २0 | श्रीमती जाधव शेवंता विष्णू | न्हावी |
| २१ | सौ. जगताप भारती रामचंद्र | मराठा |
| २२ | सौ. संकपाळ सुनंदा पांडुरंग | न्हावी |

स्त्रोत:— इचलकरंजी नगरपरिषदेचा निवडणूक निकाल २००१

इंचलकरंजी नगरपरिषदेच्या २००१ च्या निवडणूकीत निवडणून आलेल्या एकूण २२ महिला नगरसेवकांच्या पैंकी १0 मराठा जातीच्या असून २ देवांग कोष्टी जातीच्या आहेत. महार जातीच्या ४ व धनगर जातीच्या २ व लिगांयत माळी २ तसेच कारवान जातीतील १ महिला नगसेवक असून मराठा जातीचे प्रावल्य दिसून येते.

**तक्ता ३.७**

**इचलकरंजी नगरपरिषदेतील महिला नगरसेवकांचे धर्मानूसार वर्गीकरण(२००१)**

| अ. नं. | धर्म | महिला संख्या |
|---|---|---|
| १ | हिंदू | १९ |
| २ | मूस्लिम | ३ |
| | एकूण | २२ |

स्त्रोत:— इचलकरंजी नगरपरिषदेचा निवडणूक निकाल २००१

इचलकरंजी नगरपरिषदेच्या निवडणूकीमध्ये एकूण २२ महिला नगरसेवकांपैकी ३ महिला नगरसेवक मुस्लिम धर्माच्या असून १९ महिला नगरसेवक या हिंदू आहेत.

BALASAHEB KHARDEKAR
16800

**३.५.२ २००६ मधील इचलकरंजी नगरपरिषदेच्या निवडणूक:—**


२००६ मध्ये इचलकरंजी नगरपरिषदेच्या निवडणूक झाली. या निवडणूकीमध्ये ५७ वार्डमध्ये नगरपरिषद क्षेत्र विभागलेले होते. या प्रत्येक वार्डमधून १सदस्य निवडून येण्याची तरतूद होती. या निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या महिला व पुरूष सदस्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे

**तक्ता ३.८**

**इचलकरंजी नगरपरिषदेतील महिला व पुरूष नगरसेवकांचे वर्गीकरण(२००६)**

| अ. नं. | प्रकार | नगरसेवक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | महिला | २१ | ३६.८४ |
| २ | पुरूष | ३६ | ६३.१६ |
| | एकूण | ५७ | १०० |

स्त्रोत:— इचलकरंजी नगरपरिषदेचा निवडणूक निकाल २००६




इचलकरंजी नगरपरिषदेच्या २००६ च्या निवडणूकीमध्ये ५७ वार्डमधून ५७ सदस्य निवडून आले. या ५७ सदस्यांपैकी महिला सदस्यांची संख्या २१ इतकP आहे. ही सदस्य संख्या एकूण सभागृहातील एकूण टक्केवारीच्या ३६.८४ टक्के असल्याचे दिसते. २००१ निवडणूकीच्या तुलनेन महिला सदस्य संख्या १ ने कमी झाल्याचे दिसते.

तक्ता ३.९

इचलकरंजी नगरपरिषदेतप्ल महिला नगरसेवकांचे प्रभागनिहाय वर्गीकरण (२००६)

| अ.नं | प्रभाग क्रमांक | महिला नगरसेवकांची संख्या | पुरूष नगरसेवकांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | १ | — | १ |
| २ | २ | — | १ |
| ३ | ३ | १ | — |
| ४ | ४ | १ | — |
| ५ | ५ | — | १ |
| ६ | ६ | — | १ |
| ७ | ७ | — | १ |
| ८ | ८ | १ | — |
| ९ | ९ | — | १ |
| १० | १० | १ | — |
| ११ | ११ | १ | — |
| १२ | १२ | — | १ |
| १३ | १३ | — | १ |
| १४ | १४ | — | १ |
| १५ | १५ | — | १ |
| १६ | १६ | — | १ |
| १७ | १७ | — | १ |
| १८ | १८ | — | १ |
| १९ | १९ | १ | — |
| २० | २० | — | १ |
| २१ | २१ | १ | — |
| २२ | २२ | — | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | २३ | — | १ |
| २४ | २४ | १ | — |
| २५ | २५ | १ | — |
| २६ | २६ | १ | — |
| २७ | २७ | १ | — |
| २८ | २८ | — | १ |
| २९ | २९ | — | १ |
| ३० | ३० | — | १ |
| ३१ | ३१ | — | १ |
| ३२ | ३२ | — | १ |
| ३३ | ३३ | — | १ |
| ३४ | ३४ | १ | — |
| ३५ | ३५ | — | १ |
| ३६ | ३६ | १ | — |
| ३७ | ३७ | — | १ |
| ३८ | ३८ | — | १ |
| ३९ | ३९ | — | १ |
| ४० | ४० | १ | — |
| ४१ | ४१ | — | १ |
| ४२ | ४२ | — | १ |
| ४३ | ४३ | — | १ |
| ४४ | ४४ | १ | — |
| ४५ | ४५ | १ | — |
| ४६ | ४६ | १ | — |
| ४७ | ४७ | — | १ |
| ४८ | ४८ | १ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४९ | ४९ | — | १ |
| ५० | ५० | — | १ |
| ५१ | ५१ | १ | — |
| ५२ | ५२ | — | १ |
| ५३ | ५३ | १ | — |
| ५४ | ५४ | — | १ |
| ५५ | ५५ | — | १ |
| ५६ | ५६ | — | १ |
| ५७ | ५७ | १ | — |
| | **एकूण** | २१ | ३६ |

स्त्रोत:— इचलकरंजी नगरपरिषदेचा निवडणूक निकाल २००६


वरील तक्त्यावरून असे दिसते की, इचलकरंजी नगरपरिषदेच्या २००६ च्या निवडणूकीचे महिला सदस्यांचे प्रभागनिहाय विश्लेषण केलेले आहे. ५७ प्रभागापैकी १९ प्रभागामध्ये महिला आरक्षण असून एकूण ५७ नगरसेवकांपैकी २१ महिला नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या आहेत. यातील १९ महिला या महिला आरक्षण प्रभागामधून निवडून आलेल्या असून दोन महिला या सर्वसाधारण गटातून निवडून आलेल्या आहेत. यावरून असे दिसते की, प्रभाग कमांक ४० व ५७ हा प्रभाग महिला आरक्षित नसूनही या प्रभागामध्ये पुरूष उमेदवाराला हरवून महिला सदस्य निवडून आलेल्या आहेत. हा एक बदल इचलकरंजी नगरपालिकेच्या निवडणूकीत दिसून येतो. ज्यायोगे फक्त महिला आरक्षित जागेवरच महिला निवडून येतात. या टीकेला प्रभाग कमांक ४० व ५७ प्रभागामधील निवडून आलेल्या महिलांनी प्रत्युत्तर दिलेले दिसून येते ज्यातुन राजकारणामध्ये महिला सदस्यांचा फक्त सहभाग नसून त्यांचे सबलीकरण होण्याची प्रक्रिया निर्माण होत आहे. असे दिसून येते.

तक्ता ३.१०

**इचलकरंजी नगरपरिषदेतील महिला नगरसेवकांचे पक्षनिहाय वर्गीकरण(२००६)**

| अ.नं. | पक्ष | महिला नगरसेकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | १६ | ७६.१९ |
| २ | शहर विकास आघाडी, | २ | ९.५२ |
| ३ | जनसुराज्य पक्ष | १ | ४.७६ |
| ४ | शिवसेना | २ | ९.५३ |
| ५ | एकूण | २१ | १०० |

स्त्रोत:— इचलकरंजी नगरपरिषदेचा निवडणूक निकाल २००६




इचलकरंजी नगरपरिषदेच्या २००६ च्या निवडणूकीमध्ये ज्या राजकीय पक्षानीं सहभाग घेतला त्यामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष हे राष्ट्रीय स्तरांवरील पक्ष असून शिवसेना हा राज्यस्तरावरील पक्ष आहे आणि शहर विकास आघाडी, जनसुराज्य पक्ष हे स्थानिक स्तरांवर निर्माण झालेल्या आघाडया आहेत. २००६ च्या निवडणूकीमध्ये राष्ट्रीय स्तरांवरील पक्षांप्रमाणे स्थानिक स्तरावर निर्माण झालेल्या पक्षांनीही महिलांना राजकीय सहभागाची संधी निर्माण करून दिलेली दिसते. या पक्षातील महिला सदस्य निवडून येण्याचे प्रमाण राष्ट्रीय काँग्रेस पक्षामध्ये जास्त आहे. ते प्रमाण एकूण महिला

सदस्यांच्या टक्केवारीत ७६.१९ टक्के असल्याचे दिसते. या निवडणूकीत भाजपसारख्या राष्ट्रीय स्तरांवरील पक्षाची अनुपस्थिती पक्ष म्हणून दिसते.

**तक्ता ३.११**

**इचलकरंजी नगरपरिषदेतील महिला नगरसेवकांचे जातीनिहाय वर्गीकरण (२००६)**

| अ.नु | महिला नगरसेवक | जात |
|---|---|---|
| १ | हेरवाडे सुलोचना सिंद्राम | धनगर |
| २ | माळी शुभांगी प्रधान | लिगांयत माळी |
| ३ | गायकवाड सारिका रणजितसिंग | मराठा |
| ४ | नाकील अलका विष्णू | मराठा |
| ५ | भोकरे सारिका तानाजी | मराठा |
| ६ | हजारे रश्मी जितेंद्रसिंग | जाट |
| ७ | कांबळे अनुसया सुगंध | महार |
| ८ | टेकाळे राणि सत्यवान | महार |
| ९ | निऊगरे सुमन महादेव | मराठा |
| १० | पाटील शंकुतला कृष्णा | मराठा |
| ११ | बागवान राबिया सलीम | मुस्लीम |
| १२ | दळवाई ध्रुवती सदानंद | धनगर |
| १३ | भागवान अबिदा गफार | मुस्लीम |
| १४ | शेळके शितल चंद्रकांत | मराठा |
| १५ | बिरजे शुभांगी श्रीकांत | मराठा |
| १६ | ढेरे वर्षा दिपक | देवांग कोष्टी |
| १७ | भंडारे साधना संजय | देवांग कोष्टी |
| १८ | सपाटे लक्ष्मी पांडुरंग | देवांग कोष्टी |
| १९ | भंडारे पदमावती चंद्रकांत | देवांग कोष्टी |
| २० | चाळके मेघा सागर | मराठा |

| | | |
|---|---|---|
| २१ | आवाडे किशोरी प्रकाश | जैन |

स्त्रोत:— इचलकरंजी नगरपरिषदेचा निवडणूक निकाल २००६

इंचलकरंजी नगरपरिषदेच्या २००६ च्या निवडणूकीत निवडूणन आलेल्या एकूण २१ महिला नगरसेवकांच्या पैंकी ८ मराठा जातीच्या असून ४ देवांग कोष्टी जातीच्या आहेत. महार जातीच्या २व धनगर जातीच्या २ महिला नगसेवक असून मराठा जातीचे प्रावल्य दिसून येते.

तक्ता ३.१२

**इचलकरंजी नगरपरिषदेतील महिला नगरसेवकांचे धर्मानूसार वर्गीकरण(२००६)**

| अ. नं. | धर्म | महिला संख्या |
|---|---|---|
| १ | हिंदू | १९ |
| २ | मूस्लिम | २ |
| | एकूण | २१ |

स्त्रोत:— इचलकरंजी नगरपरिषदेचा निवडणूक निकाल २००६

२००६ इचलकरंजी नगरपरिषदेच्या निवडणूकीमध्ये एकुण महिला नगरसेवकांमध्ये हिंदू महिला नगरसेवक १९ तर २ मुस्लिम महिला नगरसेवक होत्या.

फिरते आरक्षण ः

- इचलकरंजी नगपरिषदेत सार्वत्रिक निवडणूकीच्यावेळी प्रभाग किंवा वार्डची रचना बदलली जाते.
- प्रत्येक प्रभागाचे आरक्षण कायमस्वरूपी नसते . ते प्रत्येक निवडणूकीच्या वेळी बदलते. रचना जशी बदलेल तसे आरक्षण बदलते.
- इचलकरंजी नगपरिषदेत अनुसुचित जाती व जमातीच्या लोकसंख्याच्या प्रमाणानुसार आरक्षण दिले आहे.
- प्रत्येक वार्डच्या लोकसंख्येनुसार आरक्षणाची तरतूद केली आहे.

**सारांश:—**

इचलकरंजी नगरपरिषदेच्या २००१ ते २०१० च्या निवडणूकीचा सारांश खालीलप्रमाणे:

१. २००१ च्या नगरपरिषदेच्या निवडणूकीमध्ये महिलांची संख्या २२ एवढी असून सौ. आवाडे किशोरी प्रकाश यांची नगरअध्यक्ष म्हणून निवड करण्यात आलेली दिसते. २००१ च्या निवडणूकीमध्ये प्रभाग क्रमांक ४, ९, ११, १६, १९ या प्रभागामध्ये महिला सदस्य निवडून आलेल्या नाहीत. या निवडणूकीमध्ये सर्वसाधारण गटातील महिलांची संख्या १४ असून नागरिक मागास प्रवर्गातील महिला ७ आहेत. तर अनुसूचित जातीतील महिलांची संख्या ५ असून अनुसूचित जमातीतील महिला या २००१ च्या निवडणूकीत नसल्याचे दिसते.

२. २००६ इचलकरंजी नगरपरिषदेच्या निवडणूक महिलांच्या राजकीय सहभागाच्या दृष्टिकोनातून महत्वाची असल्याची दिसते. प्रभाग क्रमांक ४० मधील सौ. आवाडे किशोरी प्रकाश व प्रभाग क्रमांक ५७ मधील सौ. चाळके मेघा सागर या महिला सदस्य सर्वसाधारण गटातून निवडून आलेल्या आहेत. यातील सौ. चाळके मेघा सागर ही महिला सदस्य अपक्ष म्हणून निवडून आली असून फक्त आरक्षणातूनच महिला निवडून येतात या समजला छेद या निवडणूकीच्या माध्यमातून मिळालेला आहे.

३. २००१ साली नगराध्यक्षाचे पद महिलेसाठी आरक्षीत झाले व सौ.आवाडे किशोरी प्रकाश या इंचलकरंजीच्या नगराध्यक्ष बनल्या. त्यानंतर महिला आरक्षण नसतानाही अपक्ष म्हणून निवडून आलेल्या सौ. चाळके मेघा सागर या नगराध्यक्ष बनल्या.

४. २००१ व २००६ च्या इचलकरंजी नगरपरिषदेच्या निवडणूकीमध्ये महिलांचा राजकीय सहभाग तीव्र गतीने वाढलेला दिसून येतो. नगरपालिकेच्या सभागृहातील एकूण सदस्यापैकी निम्म्यापेक्षा जास्त सदस्या या महिलाच दिवून येतात. यावरून महिलांचा प्रभाव या निवडणूकीच्या माध्यमातून दिसून येतो.

संदर्भ सूची :

१ . महाराष्ट्र नगरपालीका अधिनियम १९६५

२ . निवडणूक आयोगाचा अहवाल १९८५

३ . निवडणूक आयोगाचा अहवाल १९९०

४ . प्रा . र . घ . वराडकर , भारतीय राजकीय व्यवस्था, निरली प्रकाशन, १९९७ .

५.एखेळीकर (डॉ) रमेश,विकास प्रकाशन, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०००

६ . नागरविकास विभाग, शासन निर्णय क . २००५ . प्र . क १५६ ०५

७ . वैशाली पवार , पश्चिम महाराष्ट्रातील महानगरपालींचे राजकारण , राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग , पुणे विद्यापीठ पीएच डी चा अप्रकाशीत ग्रंथ ,२००७

८ . घोड सोपान संपा , महाराष्ट्रातील महिलाराज, अविष्कार प्रकाशन,२००८ .

९ . यादव योगेंद्र व सूहास पळशीकर ,लोकशाही जिंदाबाद , समकालीन प्रकाशन पुणेडॉ . टी . एन गायकवड, ४ महाराष्ट्रातील स्थानीक स्वशासन , स्वप्नाली प्रकाशन,अहमदापूर, २०१०

१० . ७४ वी घटनादुरूस्ती अधिनियम १९९२

११ . निवडणूक आयोगाची वेबसाईट www.Electioncommision .in